# १६

# मंडळीमध्ये प्रवेश करणे

**काही** वस्तू किमती-महाग असतात, परंतु त्या खरोखर मौल्यवान नसतात. उदा. छान छान मोहक कपडे, काही वस्तू तेवढ्याशा महाग नसतात पण त्या खरोखरी बहुमोल असतात - जसे सूर्यप्रकाश, पाऊस, वारा. काही गोष्टी फारच किमती आणि फारच मौल्यवान असतात. ख्रिस्ताची मंडळी अशीच आहेत.

नव्या करारात पाहिले तर मंडळीचे मूल्य, किती ते सांगणे, अशक्य अशी खात्री पटते. मंडळी अमूल्य आहे. मंडळीचे अपार मूल्य तीन प्रकारे आपल्यासामोर येते: पहिल्याने, मंडळीचे अमूल्य मूल्य **तिच्या दिव्य उगमातून** दिसून येते. मंडळीची संकल्पना युगादिकाळापूर्वी स्वर्गामध्ये सार्वकालिक संकल्पातून साकार झाली. (इफिस. ३:१०,११), आणि येशूच्या पृथ्वीवरील सेवाकार्यातून ती तयार झाली (मत्तय.४:१७). हा चुकलेला पश्चात विचार नसून दिव्य पूर्वविचार होता. दुसरे, असे की **तिच्यासाठी द्यावी लागलेली मोठी किंमत हेच तिच्या बहुमूल्यत्वाचे आहे**. मंडळी ख्रिस्ताच्या रक्ताने-ख्रिस्ताचे रक्त हे मोल देऊन विकत घेतली आहे असे पौलाने सांगितले आहे (प्रे. कृ.२०:२८). मंडळी अस्तित्वात आणणे हेच ख्रिस्ताच्या मरणाचे अंतिम उद्दिष्ट होते, खरेदीच्या किमतीवरुन मूल्य-महत्त्व ठरत असेल तर, ख्रिस्ताच्या रक्ताने विकत घेतलेली मंडळी ही सर्व पार्थिव संस्था संघटनांपेक्षा अधिक मौल्यवान आहे यात शंकाच नाही. तिसरे असे की, तिच्यासाठी नेमलेल्या मूल्यावरुनच तिचे मोल (महत्त्व) लक्षात येते. इतर सर्व गोष्टींहून स्वर्गाचे राज्य मिळवण्यासाठी झटून शोध करा असे येशूने आग्रहाने सांगितले आहे. त्याने म्हटले आहे, ‘‘आणखी स्वर्गाचे राज्य चांगल्या मोत्यांचा शोध करणाऱ्या कोणा एका व्यापाऱ्यासारखे आहे; त्याला एक अतिमौल्यवान मोती आढळला, मग त्याने जाऊन आपले सर्वस्व विकले आणि ते विकत घेतले’’ (मत्तय.१३:४५,४६) त्याने मंडळीची तुलना मौल्यवान मोत्याशी केली आहे, एवढेच नव्हे तर ती सर्वात मौल्यवान मोत्याशी केली आहे.

मंडळींचे हे सर्वोच्च मूल्य पाहता नव्या करारातील मंडळींची उपेक्षा केली,

तिच्याकडे दुर्लक्ष केले तर ती एक घोडचूकच होईल. लक्षाधीश माणसाने प्रभूच्या मंडळींचा शोध करून तीमध्ये प्रवेश केला नाही तर तो अनाथ परकाच आहे. मंडळींच्या बाहेर असलेला मनुष्य कितीही थोर, मोठा असला तरी तो सर्वांत क्षुल्लक होतो.

मंडळीचे मूल्य याप्रकारे प्रमादातीत, सुस्पष्ट आहे ते पाहता आपण प्रांजलपणे विचारणेच श्रेयस्कर आहे, ''की या मंडळीमध्ये प्रवेश कसा करावा?'' ज्यावर विचार केला पाहिजे असा दुसरा मोठा महत्त्वाचा प्रश्न नाही. आता आपण या प्रश्नाला नव्या करारातून कोणते उत्तर दिले आहे ते पाहू.

## उत्तर जाहीर केले

आपणाला नेमके काय हवे ते येशूला निश्चित माहीत होते. तो स्वर्गामध्ये परत गेल्यानंतर त्याच्या शिष्यांनी काय केले पाहिजे, तेही त्याला पुरेपूर माहीत होते. त्याने शिष्यांवर सोपवलेल्या कामगिरीसंबंधात तीन संपूर्ण वृत्तांत नव्या करारामध्ये नमूद केले आहेत (मत्तय.२८:१८-२०; मार्क.१६:१५,१६; लूक.२४:४६,४७). या वृत्तांतांचे महत्त्व कमी लेखून चालणार नाही. या वृत्तांतातून संपूर्ण ख्रिस्ताने आपल्या शिष्यांना दिलेल्या सूचना, मार्गदर्शनाचा समावेश आहे.

ख्रिस्ताने प्रथम आपल्या शिष्यांवर जागतिक जबाबदारी सोपवली, मग त्याने त्यांना सांगितले की, ''सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा'' (मार्क.१६:१५). दुसरे असे की सुवार्तेची घोषणा करतानाच तारण कोणत्या अटींवर कसे मिळणार तेही त्याने स्पष्ट केले आहे. त्याने आपल्या शिष्यांना काय करायचे ते सांगितले, ''जा'' तसेच जाऊन काय सांगायचे ते ही सांगितले ''सुवार्तेची घोषणा करा.'' ''जा'' आणि ''सुवार्ता'' या दोन शब्दांतून त्याने त्यांच्या भावी कार्याचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट केली.

मार्क सांगतो, त्याप्रमाणे ख्रिस्ताने एकाच वेळी, कामगिरी सोपवली आणि विश्वासाच्या शर्ती ठामपणे सांगितल्या. त्याने म्हटले, ''सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा, जो विश्वास धरतो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल, जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल'' (मार्क.१६:१५,१६). सोपवलेल्या कामगिरीच्या संबंधात येथे बाप्तिस्म्याची अट स्पष्टपणे नमूद केली आहे, तथापि विश्वासावरच विशेष भर दिला असल्याचे दिसते.

लूक शुभवर्तमानाप्रमाणे पाहता, ख्रिस्ताने ही कामगिरी दुसऱ्या कोणत्या तरी

वेळी सोपवली आणि त्यात पश्चात्तापावर विशेष भर दिला आहे. येशूने त्यांना म्हटले, ''असे लिहिले आहे की, ख्रिस्ताने दु:ख सोसावे, तिसऱ्या दिवशी मेलेल्यांतून उठावे; आणि यरुशलेमपासून आरंभ करुन सर्व राष्ट्रांना त्याच्या नावाने पश्ताताप[१] व पापक्षमा घोषित करण्यात यावी'' (लूक.२४:४६,४७). पश्चाताप, म्हणजे पाप सोडून देवाकडे वळणे, हाच ख्रिस्ती युगामध्ये सुवार्ता प्रसारामध्ये मुख्य विचार होता.

गालिलीतील एका डोंगरावर येशूने ही कामगिरी सोपवून दिली, असे चित्रण मत्तयाने केले आहे. यात त्याने बाप्तिस्म्यावर भर दिला आहे. येशूने म्हटले, ''स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे, तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा, त्यांस पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या. जे काही मी तुम्हाला आज्ञापिले ते सर्व त्यांस पाळावयास शिकवा आणि पाहा. युगाच्या समाप्तीपर्यंत मी तुमच्याबरोबर आहे'' (मत्तय.२८:१८-२०).

विश्वास, पश्चात्ताप आणि बाप्तिस्मा या तारण प्राप्तीच्या तीनही अटी पूर्ण करणे आवश्यक आहे हे स्पष्टच दिसते. यातील प्रत्येक शर्त-तरतूद आपल्या तारणाऱ्याने वेगवेगळी करून महान कामगिरीविषयीच्या तीन वृत्तांतामध्ये एकाएकावर भर दिला आहे.

या तीनही अटी सुस्पष्ट व सहज लक्षात येण्याजोग्या आहेत. येशूने सोपवलेली कागगिरी गंभीरपणे घ्यायची असेल तर या अटी नीट समजून मान्य करुन प्रभूच्या योजनेमधील त्यांचे महत्त्व ओळखले पाहिजे. प्रभूच्या राज्यात अथवा मंडळीत प्रवेश करण्यासाठी या अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. संपूर्ण ख्रिस्ती युगाचे नियमन याच अटींनी होते.

## सविस्तर उत्तर

तारणाच्या अटी नव्या करारामध्ये स्पष्ट व बिनचूक दिल्या आहेत आणि प्रेषितांची कृत्ये या पुस्तकात त्यांचे उदाहरणांसह सुस्पष्ट विवेचन केले आहे.

उदाहरणार्थ, या पुस्तकाचा आरंभ मंडळी स्थापन झाल्याच्या रोमहर्षक वृत्तांताने झाले आहे. प्रे. कृ.२ मध्ये मोठ्या लोकसमुदायाने पेत्राचे भाषण ऐकले, आपले चुकले अशी त्यांच्या अंत:करणाला चुटपुट लागली. ते जिवाच्या आकांताने म्हणाले, बंधुजनहो, ''आम्ही काय करावे?'' त्यांनी येशूवर विश्वास ठेवल्यामुळेच हा प्रश्न विचारला. पेत्राने त्यांना आज्ञा केली, पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण ...बाप्तिस्मा घ्या (प्रे.कृ.२:३८). त्या दिवसी तीन हजार लोकांनी

[१]काही प्राचिन हस्तलिखीतामध्ये येथे ''आणि'' च्या ठीकाणावर ''च्यासाठी'' मिळते.

बाप्तिस्मा घेतला. त्याचप्रमाणे पुढे प्रे. कृ.२:४७ ब मध्ये सांगितले आहे, ''...प्रभू तारण प्राप्त होत असलेल्या माणसांची दररोज त्यांच्यात भर घालीत असे.'' अखेरीस महान कामगिरी सोपवताना आमच्या प्रभूने विश्वास, पश्चात्ताप आणि बाप्तिस्मा या अटींवर तारणाची घोषणा करायची आहे असे सांगितले आहे.

प्रे. कृ.८ मध्ये आणखी एक उदाहरण आहे. प्रे. कृ.८ च्या उत्तरार्धात एका दिव्यदूताने फिलिप्पाला आणखी संदेश देण्यासाठी दक्षिणेकडे जाण्यास सांगितले (प्रे. कृ.८:२६). दोन रस्ते परस्परांना छेदतात तेथे फिलिप्पाला एक हबशी षंढ दिसला. तो आपल्या रथात बसून रस्त्याने जात होता (प्रे. कृ.८:२७,२८). हा मनुष्य मोठा धार्मिक होता, पण तो ख्रिस्ती नव्हता. त्या हबशी माणसाजवळ जा, त्याच्याशी बोल असे पवित्र आत्म्याने फिलिप्पाला सुचवले (प्रे. कृ.८:२९). फिलिप्प धावतच त्याच्याकडे गेला, तो हबशी गृहस्थ यशया संदेष्ट्याच्या ग्रंथाचे वाचन करीत होता असे फिलिप्पाला दिसले, परंतु तो वाचीत होता तो भाग त्याला समजत नव्हता (प्रे. कृ.८:३१). मग फिलिप्पाने तो हबशी वाचत होता त्याच भागापासून आरंभ करुन ख्रिस्ताचा संपूर्ण वृत्तांत त्याच्यापुढे उलगडला (प्रे. कृ.८:३५). त्याला सुवार्ता सांगितली. ख्रिस्त या जगात आला, त्याने केलेले अद्‌भुत चमत्कार हे सर्व सांगून अखेरीस तो आमच्या पापांची क्षमा देऊन आम्हाला त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांना तारण प्राप्ती व्हावी यासाठी तो मरण पावला हे सर्व त्याला सविस्तर सांगितले असणारच.

ख्रिस्ताविषयी बोलत ते पुढे जात असता रस्त्यात त्यांना एक पाण्याचे तळे दिसले. ते पाहून त्या हबशी माणसाने विचारले, ''मला बाप्तिस्मा घेण्यास काय हरकत आहे?''[२] त्या हबशी माणसाने विश्वास ठेवला होता म्हणून त्याने बाप्तिस्मा घेण्याची

---

[२]प्रेषितांच्या कृत्यांमधील ८:३७ हे वचन प्रेषितांची कृत्ये या पुस्तकाच्या अनेक हस्तालिखितांमध्ये आढळत नाही. हे पाहता हे वचन नव्या कराराच्या मूळ संहितेमध्ये नसावे असा अनेकांनी निष्कर्ष काढला. तथापि या वचनामध्ये फिलिप्पाने केलेले विधान त्या परिस्थितीत असणे अगदी स्वाभाविक व रास्त आहे. त्या हबशी षंढाला ख्रिस्त कोण आहे, संदेष्ट्याने कोणाविषयी लिहिले आहे ते काहीच माहीत नव्हते. तेव्हा ख्रिस्ताविषयी थोड्याशा संभाषणानंतर त्या षंढाने बाप्तिस्मा घेण्यचा विचार केला. तेव्हा फिलिप्पाने म्हटले, ''जर आपण आपल्या सर्व अंत:करणाने विश्वास धरता तर योग्य आहे'' आणि बाप्तिस्म्याची तयारी करत्यावेळेस याला कधी बाहेर ठेवल्या जावू शकत नाही. देवाच्या पूत्राच्या रुपामध्ये ख्रिस्ताची कबूली विश्वासाची खात्री आहे आणि प्रभू येशूच्या महान आज्ञेमध्ये वर्णीत केलेल्या विश्वास करव्याच्या अटीतच वाढते.

इच्छा व्यक्त केली. त्यांनी रथ थांबवला. त्याने उत्तर दिले, येशू ख्रिस्त देवाचा पुत्र आहे असा मी विश्वास धरतो. ते दोघे त्या पाण्यात उतरले, फिलिप्पाने त्याला पाण्यात बुडवून बाप्तिस्मा दिला (प्रे. कृ.८:३८). बाप्तिस्मा झाल्यावर तो हबशी आनंद करीत आपल्या वाटेने गेला.

पुन्हा एकवार महान कामगिरी सोपवताना आमच्या प्रभूने तारण मिळण्यासाठी/ होण्यासाठी घातलेल्या शर्तींचे येथे पालन करण्यात आले. फिलिप्पाने उपदेश केला, ख्रिस्त कोण आहे ते स्पष्ट केले. ती सुवार्ता ऐकून त्या हबशी षंढाने प्रत्यक्षात विश्वास ठेवला (प्रे. कृ.८:३५,३६). तो हबशी धार्मिक होता, तो देवाच्या इच्छेप्रमाणे चालण्याचा प्रयत्न मनापासून करीत होता. फिलिप्पाने ख्रिस्ताचा सुवार्ता संदेश त्याला सांगितला, त्याने त्याचा स्वीकार केला त्यावरूनच त्याने पश्चाताप केल्याचे लक्षात येते. प्रेषितांची कृत्ये या पुस्तकात बाप्तिस्म्याचा वृत्तांत येथे अतिशय स्पष्टपणे सांगितला आहे. तेवढा याच पुस्तकात अन्यत्र कोठे सांगितलेला नाही.फिलिप्प व तो हबशी दोघेही त्या पाण्यात उतरले, आणि फिलिप्पाने त्याला पाण्यात बुडवून बाप्तिस्मा दिला. (प्रेषितांची कृत्ये मधील पालट /परिवर्तन झाल्याची उदाहरणे, तक्त्या मध्ये पाहावा.)

समजा, तुम्ही एखाद्या राज्यामध्ये राहता. तेथील राजा व्यक्तिश: तुमचा मित्र आहे. एक दिवस, राजाबरोबर बोलता बोलता त्याने तुम्हाला म्हटले, तू नंतर येऊन मला भेटलास तर मी तुझा सर्व कर माफ करीन. हे ऐकून तुमच्या आनंदाला पारावार उरत नाही आणि महिन्याभरात परत येऊन राजाला भेटावे असा निश्चय करतो. पुढे यथावकाश, तुम्ही राजाला भेटण्यासाठी राजवाड्यात जाता. आता आपले कर माफ होणार या विचाराने तुम्ही आनंदात असता, राजवाड्यात पोचल्यावर राजा दुसऱ्या देशात गेला आहे असे समजते. मग तुम्ही शाही रखवालदाराला सांगता की, राजाच्या सांगण्याप्रमाणे तुम्ही आला आहात. राजाला येऊन भेटल्यावर तो तुमचे कर माफ करणार असे त्यानेच सांगितले होत. त्यावर रखवालदाराने म्हटले, ‘‘राजाने तुमच्यासाठी विशेष व्यवस्था केली आहे.’’ तुम्ही त्यांना तेथे येण्याचे कारण काय ते सांगता. त्यावर त्यांनी म्हटले, ‘‘राजेसाहेब येथे होते तेव्हा त्यांना एका शब्दाने कर माफ करण्याचा अधिकार होता. पण आता ते परदेशी गेले आहेत. जाताना त्यांनी काही विशिष्ट अटी, शर्ती ठेवल्या आहेत. त्यांच्या आधारे कर माफ करता येतील. आता तुम्हाला या अटीचे पालन करावे लागेल. सर्वप्रथम, तुम्ही तुमच्या घरी परत जा. दुसरे असे की, तुमचे म्हणणे काय आहे ते आम्हाला पत्र लिहून कळवा. तिसरे, तुमच्या घरातील सर्वांची नावे त्या पत्रात लिहा आणि चौथे, तुमच्या या पत्रावर तीन साक्षीदारांच्या

समक्ष हस्ताक्षर करा. या सर्व अटी पूर्ण झाल्या की तुमच्या सर्व करांची माफी मिळेल.''

आता हे उदाहरण आणि ख्रिस्ताने प्रत्यक्षात जे केले आहे ते पाहा आणि या दोहोंची तुलना करा. ख्रिस्त येथे असताना तो अनेकदा केवळ एका शब्दाने पापांची क्षमा करीत असे. उदाहरणार्थ त्याने वधस्तंभावर खिळलेल्या त्या चोराला क्षमा केली (लूक.२३:४३). पुढे ही पृथ्वी सोडून स्वर्गात जाण्याच्या वेळी लोकांना ख्रिस्ती युगामध्ये तारणप्राप्त होण्याच्या अटी कोणत्या ते त्याने सांगितले त्या शिवाय ही सोपवलेली कामगिरी जगाच्या अंतापर्यन्त प्रभावी राहील असेही त्याने सांगितले (मत्तय.२८:२०). आता राजा गेला आहे तरी क्षमा मिळण्याविषयी त्याने लावून दिलेल्या अटी व शर्ती तशाच कायम आहेत.

## उत्तराप्रमाणे आचरण

मंडळीमध्ये प्रवेश करण्याच्या अटी आम्हा प्रत्येकालाच लागू केल्या पाहिजेत. ख्रिस्ताने अखेरीस सोपविलेल्या कामगिरीमध्ये बदल झालेला नाही. ती सोपवली होती तेव्हा जी व जशी होती तशीच आजही आहे. त्यात रतीभरही फरक पडलेला नाही. पेत्राने केलेला पहिला उपदेश ऐकणाऱ्यांसाठी तारण मिळण्याच्या अटी होत्या त्याच नेमक्या आजही आमच्यासाठी आहेत. मंडळीमध्ये प्रवेश करण्यासाठीच्या अटी ख्रिस्ताने नेमल्या आहेत व तोच प्रत्यक्षात मंडळीत प्रवेश देतो. माणसांनी कितीही प्रतिपादन केले, कितीही सूचना दिल्या, शिक्षण दिले तरी काही केल्या त्याचे अखेरचे इच्छापत्र व करार यात तिळमात्र बदल होत नाही. राजा गेला आहे आणि ख्रिस्ती युगासाठी त्याने नियम व अटी नेमले आहेत. त्याचे पालन केलेच पाहिजे.

त्याच्या मंडळीत प्रवेश करण्यासाठी त्याने नेमलेल्या अटींच्या संबंधात तुमचा विचार काय आहे? तुम्ही विश्वास ठेवता का? देवाचे वचन हाच विश्वासाचा उगम आहे (रोम.१०:१७). मनुष्याचे ज्ञान, शहाणपण, विद्वत्ता अगर कर्तृत्व या कशानेही विश्वास उत्पन्न होऊ शकत नाही. तुमचा देवावर विश्वास आहे का? ख्रिस्त देवाचा पुत्र आहे आणि मानवजातीचा तारणारा आहे यावर तुमचा विश्वास आहे ना?

तुम्ही आपल्या पापांचा पश्चात्ताप केला आहे का? (प्रे. कृ.१७:३०,३१). तुम्ही पापे सोडून जिवंत देवाकडे वळला आहात का? देवाची इच्छा कशीही असो, ती आपल्याला कोठे नेणार हे माहीत असो वा नसो तरी तुम्ही त्याप्रमाणे वागण्यास, करण्यास स्वत:ला समर्पित केले आहे काय?

देवाचा पुत्र व प्रभू म्हणून येशूवर तुमचा विश्वास आहे हे जाहीर केले आहे का? (रोम.१०:१०). येशू तारणारा व प्रभू आहे हे तुम्ही त्याप्रमाणे वागण्यास, करण्यास स्वत:ला समर्पित केले आहे काय?

तुमचा बाप्तिस्मा झाला आहे का? महान कामगिरी सोपवताना सांगितलेला बाप्तिस्मा पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने (मत्तय.२८:१९,२०) बुडवून (रोम.६:४) ख्रिस्तामध्ये (रोम.६:३; गलती.३:२७) पापक्षमेसाठी आहे (प्रे.कृ.२:३८; २२:१६) नव्या करारामध्ये सांगितल्याप्रमाणे तुम्ही बाप्तिस्मा घेतला आहे काय?

अंतिम कामगिरी सोपवताना ख्रिस्ताने नेमून दिलेल्या अटींचे पालन केल्यानंतर आमचा विश्वासू प्रभू व तारणारा आम्हाला आपल्या मंडळीत अगर राज्यात प्रवेश देईल हे म्हणणे रास्तच आहे. प्रभूने घालून दिलेल्या अटी बाजूस ठेवणे, त्यात कमी अधिक करणे कोणालाच शक्य नाही, त्याऐवजी दुसरे नियम आणणे अगर त्यात काही भलतेच घुसडणे असले प्रकार आपण चालू देत नाही. ख्रिस्ताला खरोखर समर्पित झाल्यावर आज्ञापालन करणे हेच इतिकर्तव्य असते.

## सारांश

नव्या करारानुसार असलेल्या मंडळींमध्ये तुम्ही प्रवेश केला आहे काय? केला नसेल तर आजच त्यात प्रवेश करण्यास तुम्ही तयार आहात?

नव्या करारानुसार स्थापन केलेल्या मंडळींमध्ये प्रवेशासाठी प्रभूने नेमून दिलेल्या अटी मन:पूर्वक पूर्ण करणाऱ्या कोणालाही त्या प्रवेश मिळतो. ही खरोखरी सर्वात महान व प्रभावी मंगलमय वार्ता आहे. सर्व राष्ट्रांना, सर्व वंशांना आणि सर्व लोकांना त्याच्या राज्यामध्ये प्रवेश करून ख्रिस्तामध्ये एक होता येते (इफिस.२:१४).

पाया खरा, सत्य आहे याची खात्री करून आपण प्रथमपासूनच सुरुवात करावी हेच सुज्ञपणाचे आहे. तुम्ही प्रभूने तारणासाठी नेमलेल्या अटींनुसार आज्ञापालन केले नसेल तर आताच त्या सर्व अटी ताबडतोब व सर्वस्वी पूर्ण करा. त्याच्या राज्यामध्ये प्रवेश करा आणि त्याच्या व फक्त त्याच्याच राज्याचे नागरिक म्हणून आनंदाने कालक्रमणा करा.

ख्रिस्ताच्या मंडळीमध्ये प्रवेश केल्याशिवाय, तिचे मोल आणि महत्त्व तुम्हाला कधीही समजणार नाही.

## अभ्यासासाठी प्रश्न

*(उत्तरे पृष्ठ 240 वर आहेत)*

१. प्रभूच्या मंडळीच्या अतुलनीय मूल्याचे वर्णन करा.

२. महान कामगिरीसंबंधीच्या अटी आज ख्रिस्ती लोकांवर बंधनकारक आहेत का?

३. वधस्तंभावर खिळलेल्या त्या चोराचे झाले तसे आपले तारण का होऊ शकत नाही?

४. आज एखाद्याला मंडळीचा सभासद कसे होता येईल?

५. तारण पावलेल्या लोकांचा मंडळीमध्ये माणसे समावेश करतात का?

६. ख्रिस्ती होण्यासाठी एखाद्याने प्रेषितांची कृत्ये या पुस्तकामध्ये केले आहे तसे केले तर प्रेषितांची कृत्ये या पुस्तकामध्ये देवाच्या इच्छेनुसार आज्ञापालन करण्यासाठी त्याने जे केले तेच त्याच्यासाठी करणार नाही असे मानण्यास काही कारण आहे काय?

७. आपण ख्रिस्ताच्या मंडळीमध्ये आहोत याची खातरजमा कशी करून घ्यावी?

८. प्रभूने तारण प्राप्तीसाठी नेमलेल्या अटींमध्ये फेरफार केल्याने फार मोठी हानी झाली आहे काय?

## शब्दार्थ

**येशूचे अखेरचे इच्छापत्र व करार –** नवा करार (इब्री.९:१५-१७).

**स्वत:चे –** वेगळे केलेले १ पेत्र २:९, पण ‘‘तुम्ही तर निवडलेला वंश, राजकीय याचकगण, पवित्र राष्ट्र देवाचे स्वत:चे लोक असे आहा यासाठी की ज्याने तुम्हास अंध:कारातून काढून आपल्या अद्‌भुत प्रकाशात पाचारण केले. त्याचे गुण तुम्ही प्रसिध्द करावे.’’

## प्रेषितांची कृत्येमधील मन परिवर्तनाची उदाहरणे

| सुवार्ता ऐकली | विश्वास ठेवला | पश्चात्ताप केला | पत्करले | बाप्तिस्मा घेतला | तारण झाले |
|---|---|---|---|---|---|
| यहुदी लोक<br>प्रे.कृ.२ | त्यांच्या अंत:करणावर चुटपुट लागली (व.३७) | पश्चात्ताप करा (व.३८) | | “बाप्तिस्मा घ्या”(व.३८)<br>“बाप्तिस्मा घेतला”(व.४१) | “पापांची क्षमा व्हावी म्हणून” (व.३८) |
| शोमरोनी लोक<br>प्रे.कृ.८ | लोकांचा विश्वास बसला (व.१२) | | | ह्यांच्या बाप्तिस्मा झाला (व.२१) | |
| षंढ<br>प्रे.कृ.८ | (जर आपण विश्वास धरता) (व.३७) | | येशू ख्रिस्त देवाचा पुत्र आहे असा मी विश्वास धरतो (व.३७) | बाप्तिस्मा घेण्यास (व.३६); त्याने त्याला बाप्तिस्मा दिला (व.३८) | आपल्या वाटेने हर्ष करीत चालला (व.३९) |
| शौल<br>प्रे.कृ.९; २२;२६ | | उपास व प्रार्थना करीत होता (प्रे.कृ.९:९,११) | प्रभो (प्रे.कृ.९:५) | बाप्तिस्मा घेतला (प्रे.कृ.९:१८);<br>बाप्तिस्मा घे (प्रे.कृ.२२:१६) | पातकांचे क्षालन कर (प्रे.कृ.२२:१६) |
| कर्नेल्य<br>प्रे.कृ.१०;११ | त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकास (प्रे.कृ.१०:४३) | जीवन मिळावे म्हणून पश्चात्ताप बुध्दी दिली आहे. (११:१८) | | बाप्तिस्मा व्हावा (१०:४७);<br>बाप्तिस्मा व्हावा अशी आज्ञा केली (१०:४८) | पापांची क्षमा (प्रे.कृ.१०:४३) |
| लुदिया<br>प्रे.कृ.१६ | | | | बाप्तिस्मा झाला (व.१५) | |
| तुरुंग अधिकारी<br>प्रे.कृ.१६ | प्रभू येशूवर विश्वास ठेव (व.३१)देवावर विश्वास ठेवून (व.३४) | त्यांच्या जखमा धुतल्या (व.३३) | | बाप्तिस्मा झाला (व.३३) | तुझे तारण होईल. (व.३१); आनंदोत्सव केला (व.३४) |
| करिंथकर<br>प्रे.कृ.१८ | विश्वास ठेवला (व.८) | | | बाप्तिस्मा घेतला (व.८) | |